राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे
विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१.

अपिल क्रमांक : ७/पुणे/२००७
दिनांक :- १८/४/२००७

प्रति,
श्री. मुरलीधर राजाराम बरकडे
रा. ५९४ गुरुवार पेठ, कस्तुरे चौक,
पुणे ४११ ०४२.

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे-१

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे-१

## विवेचन

श्री. मुरलीधर राजाराम बरकडे, सेवा निवृत्त उप आवेक्षक कर्मचारी, यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे यांच्याकडे दि. २०.१०.२००५ व १८.११.२००५ रोजी केलेल्या अर्जाव्दारे आपल्या

पदोन्नतीच्या संदर्भातील व व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या संदर्भातील सूट अनुज्ञेय असण्याविषयीची माहिती मागितली होती. या स्वरुपाचे प्रत्येकी दोन-दोन या प्रमाणे चार अर्ज त्यानी या दोन तारखांना केले होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ८.१२.२००५ रोजी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही, म्हणून त्यानी दि.९.१.२००६ रोजी अपिलीय अधिकारी, तथा अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे-१ यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. २४.२.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करणारा आदेश दिला. त्या विरुध्द श्री. बरकडे यांनी दि. १५.४.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्याची सुनावणी दि. १८.४.२००७ रोजी घेतली. त्यावेळी अपीलकर्ता श्री. मुरलीधर राजाराम बरकडे, जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे, श्री. श.व्यं.कौलगी हे उपस्थित होते. अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (व्दारे), पुणे श्री. गो.य.टिपरे तातडीच्या कामामुळे आयोगाच्या पूर्वपरवानगीने अनुपस्थित होते.

श्री. बरकडे हे उपरोक्त यांत्रिकी मंडळात उप आवेक्षक या पदावर काम करीत होते. दि. ३१.१२.१९९६ रोजी ते सेवानिवृत्त झाले. आपल्याला सेवेच्या कालावधीत कालबध्द पदोन्नती व तिचे वेतनवाढ आदि फायदे मिळाले नाहीत, अशी त्यांची मुख्य तक्रार आहे. या अनुषंगाने मंडळाशी त्यांचा बराच पत्रव्यवहार झालेला आहे. कालबध्द पदोन्नतीनुसार आपल्याला कनिष्ठ अभियंता वेतनश्रेणी मिळणे आवश्यक होते, असे श्री. बरकडे यांचे म्हणणे आहे. परंतु अशा प्रकारची पदोन्नती देण्यास ते पात्र नसल्यामुळे त्याना पदोन्नती देण्यात आली नाही. मात्र नियुक्तीपासून दोन पदोन्नती त्याना देण्यात आल्या आहेत. तरीही आपल्याला पदोन्नती मिळाली नसल्याची तक्रार ते सातत्याने करीत आहेत, असे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. तेच त्यानी सुनावणीतही नमूद केले. श्री. बरकडे यांनी महाराष्ट्र न्यायाधीकरणाकडे (मॅट) या मागणी बाबत केलेला अर्ज न्यायाधिकरणांने पूर्वीच फेटाळलेला आहे शासनाची

भूमिका त्याना वारंवार कळविण्यातही आलेली आहे. सन १९९९ मधील त्या स्वरुपाच्या विविध पत्रांच्या प्रती उत्तरवादींनी यावेळी सादर केल्या. परंतु श्री. बरकडे सातत्याने त्याच स्वरुपाची मागणी अर्जाव्दारे व अपिलाव्दारे करीत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागण्याच्या स्वरुपात याच मागण्या ते मांडत आहेत. वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट आपल्याला लागू नसावी, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु खात्यातंर्गत परीक्षा व व्यावसायिक परीक्षा यामधील फरक त्याच्या ध्यानात येत नाही, असे सुनावणीच्या वेळीही आढळून आले.

याच विषयाबाबत राज्य माहिती आयोगाकडे श्री. बरकडे यांनी केलेल्या दोन अपिलांची सुनावणी दि. ३.१०.२००६ रोजी राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश वि. जोशी यांच्यापुढे झ ाली होती व दोनही अपिले फेटाळून लावण्यात आली होती. त्याच विषयावरील तेच मुद्दे असलेले हे नवे अपिल आहे मात्र आपल्याला सेवापुस्तक वेळेत दाखविले गेले नाही, या त्यांच्या मुद्दयांबाबत उपस्थित अधिकारी काही सांगू शकले नाहीत. तसेच पदोन्नती व वेतनवाढ दिली तर सेवापुस्तकात तशी स्पष्ट नोंद का केली गेली नाही, याचेही उत्तर उपस्थित अधिकारी देऊ शकले नाहीत. हा सर्व विषय सन १९६४ ते १९९६ या कालावधीशी संबंधित आहे. तसेच वेतन निश्चिती करणाची नोंद सेवापुस्तकात असुन त्यात वेतनवाढ व पदोन्नती अंतर्भूत आहे, असे स्पष्टीकरण उपस्थित अधिकाऱ्यांनी दिले.

श्री. बरकडे यांनी विविध पातळ्यांवर वारंवार केलेले त्याच स्वरुपाचे अर्ज व शासनाकडून देण्यात आलेली त्याच त्याच माहितीची उत्तरे यांच्या पुनरावृत्ती पलीकडे या अपिलांमधून काहीही निष्पन्न होताना दिसत नाही. श्री. बरकडे यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अनेकदा दिलेली आहे. माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत तेवढाच विषय समाविष्ट होतो. पदोन्नती, व्यावसायिक परीक्षेतुन सूट वगैरे मागण्यांचा निर्णय

विविध पातळ्यांवरुन पूर्वी झालेला असून त्याचा माहितीच्या अधिकाराच्या कायद्याच्या कक्षेत समावेश होत नाही.

वरील सर्व बाबी लक्षात घेता मी पुढील आदेश देत आहे :

## आदेश

अपीलकर्त्याचे दोनही अर्जाच्या संदर्भातील अपील फेटाळण्यात येत आहे.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- २६/ ४ /२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला,
कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

तक्रार क्रमांक : ११७/पुणे/२००७
११८/पुणे/२००७
सुनावणी दिनांक :- १८/४/२००७

श्री. धनाजी पांडुरंग काशीद
शाखा अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) — अपीलकर्ता
उपविभाग, माळशिरस, जि. सोलापूर

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर — उत्तरवादी

## विवेचन

अपीलकर्ता श्री. धनाजी पांडुरंग काशीद, प्रभारी उपअभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, बार्शी (सध्या शाखा अभियंता, उपविभाग, माळशिरस) यांनी जन

माहिती अधिकारी म्हणून काम करताना प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लावलेल्या शास्तीविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री. रा.प.पवार यांनी दि. ९.१२.२००५ व १६.१२.२००५ अशा दोन अर्जान्वये जन माहिती अधिकारी श्री. धनाजी पांडुरंग काशीद, सौ. एस.टी. पाटील या शाखा अभियंतेने केलेल्या कामाच्या व खर्चाच्या संदर्भातील माहिती मागितली होती. श्री. धनाजी पांडुरंग काशीद हे तेव्हा जन माहिती अधिकारी होते. त्यानी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये विहीत मुदतीत माहिती दिली नाही, म्हणून श्री. रा.प. पवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी यांचेकडे अनुक्रमे दि. १०.१.२००६ व दि. १९.१.२००६ रोजी अपील केले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.१८.२.२००६ रोजी या दोन्ही अपिलांची सुनावणी केली. जन माहिती अधिकाऱ्याचा विलंबाबद्दलचा खुलासा समाधानकारक नसल्याचे नमूद करुन त्यानी श्री. काशीद यांना अनुक्रमे रुपये १७५०/- व रु.१२५०/- असा दंड करणारा आदेश दि. ९.३.२००६ रोजी दिला. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दंड करण्याचा अधिकार प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाही. अशा कारवाईस राज्य माहिती आयोग सक्षम आहे. म्हणून श्री. काशीद यांनी गट विकास अधिकाऱ्यांनी केलेल्या दंडाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.४.२००६ रोजी दोन अपिले दाखल केली होती. त्यांची सुनावणी दि. २३.३.२००७ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी उभय पक्ष उपस्थित न राहिल्यामुळे दि. १८.४.२००७ रोजी पुन्हा सुनावणी ठेवण्यात आली. तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यांची बदली झालेली असून त्या जागी आलेले गट विकास अधिकारी श्री. संजय कृष्णा चिल्लाळ उपस्थित होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांना दंडाचे अधिकार नसल्यामुळे दि. १३.४.२००७ रोजी दंड रद्द करण्यात आल्याचा दुरुस्ती आदेश श्री. चिल्लाळ यानी यावेळी सादर केला. दंड रद्द झाल्यामुळे आपली तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन श्री. काशिद यांनी पाठविले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. ९.३.२००६ रोजी दंडाचा आदेश दिला. तो नियमबाह्य असल्याचे लक्षात येऊन रद्द करण्यास तेरा महिन्यांचा कालावधी लागावा, हे उचित नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाबाबत शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये अद्याप पुरेशी जागृती आलेली नाही, याचे हे निदर्शक आहे.

## आदेश

दोन्ही अपिले मागे घेण्यात येत असल्यामुळे निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २७/०४/२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर.
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
व्दारा : विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन पुणे ४११ ००१
अपील क्रमांक : १२/पुणे/०७
दिनांक : १९/४/२००७

श्री. रामचंद्र तुकाराम गायकवाड,
रा. जी/१३. कुमार पार्क मार्केटयार्डचे मागे,
बिबवेवाडी, कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ३७ ........अपीलकर्ता....

विरुध्द

१. अपिलीय प्राधिकारी तथा
सहपोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे.

२. जन माहिती अधिकारी तथा
सह पोलिस आयुक्त मुख्यालय व
सहाय्यक माहिती अधिकारी, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे. .......उत्तरवादी....

# विवेचन

अपीलकर्ता श्री. रामचंद्र तुकाराम गायकवाड यांनी दिनांक ३/३/२००६ रोजी जन माहिती अधिकारी, पोलिस आयुक्तालय, पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती:

दिनांक ८/१०/२००४ रोजी आरोपींच्या बंदोबस्तासाठी नेमलेल्या पथकाबाबत आरोपी पार्टीच्या संदर्भात करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या संपूर्ण अहवाल व जबाबांच्या प्रती मिळाव्या.

जन माहिती अधिकारी, अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेले निर्णय, तसेच मूळ अर्ज व त्यासोबतच्या जोडपत्राच्या प्रती यातील कोणतीही कागदपत्रे श्री. गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडलेली नव्हती. त्यांनी मागितलेली माहिती मुद्रांक घोटाळयातील आरोपींच्या बंदोबस्तासाठी नेमलेल्या पोलिसांच्या संदर्भात होती. श्री. गायकवाड हे

त्यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक लष्कर पोलिस ठाणे, पुणे येथे होते व संबंधित प्रकरणात ज्यांची चौकशी होती त्यांत त्यांचा समावेश होता. जन माहिती अधिका-यांनी ही माहिती दिलेली नाही. प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सह पोलिस आयुक्त यांनी श्री. गायकवाड यांचे दिनांक ६/३/२००६ च्या अपिलावर दिनांक २४/३/२००६ रोजी निर्णय दिला. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(एच) अन्वये ही माहिती नाकारण्याचा निर्णय योग्य ठरवून त्यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. गायकवाड यांनी दिनांक ४/४/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दिनांक १८/४/२००६ रोजी त्याची सुनावणी ठेवली होती. अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलिस आयुक्त श्री. प्रभात रंजन व अपीलकर्ता श्री. रामचंद्र तुकाराम गायकवाड उपस्थित होते. प्रकरणाचे गांभीर्य व चालू असलेली चौकशी यांचा विचार करुन त्यावेळी ही माहिती दिली नाही. परंतु नंतर दि.२९/१/२००७ राजी आवश्यक ती माहिती दिली आहे, असे पोलिसांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळाली असून ती पुरेशी आहे व आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे श्री. गायकवाड यांनी यावेळी सांगितले [redacted] व तसे लेखीही दिले.

## आदेश

मिळालेल्या माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्ता श्री. रामचंद्र तुकाराम गायकवाड यांनी मान्य केले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे.**

क्र/ा८। ९१

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर.
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
व्दारा : विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन पुणे ४११ ००१
अपील क्रमांक : १५/पुणे/०७
दिनांक : १९/४/२००७

श्री. नरहरी पांडुरंग गंडाळे,
व्दारा श्री. ए. डी. देशपांडे,
रा. स.नं.१४ राज रेसिडेन्सी,
दुसरा मजला, फलॅट नं. ५ आनंदनगर,
सिंहगड रोड, पुणे ........अपीलकर्ता....

विरुध्द

१. अपिलीय प्राधिकारी तथा
सहपोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे .......उत्तरवादी....

## विवेचन

श्री. नरहरी पांडुरंग गंडाळे यांनी दिनांक ७/१/२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांच्या घराच्या संदर्भात बांधकामदार व पोलिस यांनी केलेल्या अन्यायाबाबत पोलिस उप आयुक्त श्री. देशभ्रतार यांनी केलेल्या चौकशी अहवालावरील कारवाईबाबतची माहिती या अर्जात मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ९/३/२००६ रोजी श्री. गंडाळे यांना उत्तर पाठवून काही माहिती दिली. त्याने समाधान न झाल्याने श्री. गंडाळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस आयुक्त, पुणे यांच्याकडे दिनांक १३/३/२००६ रोजी अपील केले. अपिलीय प्राधिकारी म्हणून सहपोलिस आयुक्तांनी दिनांक ७/४/२००६ रोजी त्याची सुनावणी घेतली.

त्यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द श्री. गंडाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २/५/२ रोजी अपील दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक १८/४/२००७ रोजी घेण्यात आली. त्यावेळ श्री. गंडाळे व अपिलीय प्राधिकारी म्हणून सहपोलिस आयुक्त श्री. प्रभात रंजन हे उपस्थित होते.

श्री. गंडाळे हे ज्येष्ठ नागरिक ( वय वर्षे ६७ ) असून त्यांनी मांडलेला प्रश्न १९९२ सालातील घटनेशी संबंधित आहे. घरमालक विठठल विनायक भुसकुटे व बांधकामदार श्री. दिलीप वसंत गुप्ते यांनी १९९२-९३ साली वेगवेगळया कारणांवरुन दिलेल्या त्रासाबाबत, तसेच याच अनुषंगाने सन २००० पर्यंत शनिवार पेठ पोलिस चौकी व विश्रामबाग पोलिस ठाणे येथे तक्रारी करणारे अर्ज श्री. गंडाळे (रा. ३२३ ड शनिवार पेठ पुणे ) यांनी दिले होते. श्री. गंडाळे यांचे कुटुंब वरच्या मजल्यावर रहाते. खालचा मजला पाडणे, न्यायालयाचा मनाई हुकूम असताना दुस-या मजल्यावरील पुढील खोलीचे काही बांधकाम पाडणे, श्री. गंडाळे यांच्या मुलीला संडासमध्ये कोंडून ठेवणे, घरमालक व बांधकामदार यांनी श्री. गंडाळे रहात असलेल्या खोलीला खालून दणका मारुन पहिला माळा व दुसरा माळा यातील पुढील खोल्या पाडल्यामुळे श्री. गंडाळे यांचा मुलगा ढिगा-यात गाडला जाऊन जखमी होणे असे प्रकार श्री. गंडाळे यांनी तक्रारीमध्ये नोंदविले आहेत. संबंधित पोलिस अधिका-यांनी त्याची योग्य ती दखल न घेता बांधकामदार व घरमालक यांना सहाय्य करुन श्री. गंडाळे यांच्यावर अन्याय केलेला आहे, असा स्पष्ट अहवाल तत्कालीन पोलिस उपआयुक्त, वाहतूक शाखा पुणे शहर श्री. एच.बी.देशभ्रतार यांनी दिनांक ९/८/२००१ रोजी दिला आहे. दरम्यानच्या काळात श्री. गंडाळे यांनी वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडे तीन अर्ज केले, तसेच न्यायालयात पोलिसांच्या अन्यायाविरुध्द दावे दाखल केलेले आहेत. श्री. गंडाळे यांनी वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडे केलेल्या अर्जांबाबत पोलिसांनी काय कारवाई केली, याबाबतची माहिती त्यांनी जनमाहिती अधिका-यांकडे मागितली होती. तसेच श्री. देशभ्रतार यांच्या अहवालाच्या अनुषंगाने पुरवणी अरोपपत्र सादर करावे, अशी मागणी श्री. गंडाळे यांनी केलेली आहे. या मागणीसाठी आपण केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी सुनावणीच्या वेळी दिली, तसेच या सर्व त्रासामुळे आपल्या आरोग्यावर व कुटुंबाच्या स्वास्थ्यावर झालेल्या विपरीत परिणामाबाबतची व्यथाही त्यांनी मांडली. अर्थात ही त्यांची बाजू आहे.

श्री. गंडाळे यांच्या बाबतीत घडलेला प्रकार गंभीर व अन्याय्यकारक आहे, असे सकृतदर्शनी उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसत असले तरी हा विषय माहिती अधिकाराच्या

कायद्याच्या कक्षेतील नाही. (अ) त्यांनी वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडे केलेल्या तीन अर्जांवरील कारवाई (ब) देशभ्रतार अहवालाच्या अनुषंगाने केलेली कारवाई याबाबतची माहिती त्यांना दिली गेली की नाही, या दोन मुद्दयांचा विचार माहिती अधिकाराच्या अधिनियमांतर्गत समाविष्ट होतो.

श्री. गंडाळे यांनी मांडलेला विषय गंभीर स्वरुपाचा आहे व माहिती अधिकार अधिनियमातच नव्हे, तर एकूण मानवतेच्या व न्यायाच्या भूमिकेतून त्याचा विचार केला पाहिजे याबद्दल उपस्थितांचे दुमत दिसले नाही. परंतु, पूरक आरोपपत्र सादर करणे, दोषी पोलिस अधिका-यांविरुध्द कारवाई करणे हे पोलिस विभागाच्या प्रशासकीय अखत्यारीतील विषय आहेत. श्री. गंडाळे यांना उपलब्ध सर्व माहिती दिली गेली, तसेच अपिलातही त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहपोलिस आयुक्त, श्री. प्रभात रंजन यांनी सुनावणीत सांगितले.

पोलिस खात्यावर कामाचा प्रचंड ताण असून माहिती मागण्याचे प्रमाण लक्षात घेता त्यादृष्टीने पुरेसे मनुष्यबळ नाही. त्यामुळे नियमित स्वरुपाचे दैनंदिन काम सांभाळून माहितीचे संकलन करणे व ती पुरविणे याचीही ताणामध्ये भरच पडते, असे श्री. प्रभात रंजन यांनी विस्ताराने सांगितले. मात्र तरीही माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत मुदतीत माहिती देण्यावर व अपिलाची सुनावणी करुन तक्रार दूर करण्यावर भर असतो, असे त्यांनी नमूद केले. अपु-या मनुष्यबळाचा प्रश्न सरकारकडे मांडण्यात आला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी मांडलेल्या अडचणीमधील तथ्य ध्यानात घेऊनही माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आवश्यक बाबींची पूर्तता हा कायद्याच्या अनुपालनाचा अपरिहार्य भाग आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, मुख्यालय यांनी दिनांक ९/३/२००६ रोजी श्री. गंडाळे यांना पाठविलेल्या उत्तरात संबंधित माहिती दिली आहे. प्रकरण गुंतागुतीचे असल्यामुळे उत्तरासाठी लागलेला विलंब रास्त आहे. माहिती नाकारण्याचा प्रयत्न केलेला नाही, हे स्पष्ट होते. अपीलकर्त्यांनीही ते मान्य केलेले आहे.

सहाय्यक जनमाहिती अधिका-यांनी दिलेली माहिती श्री. गंडाळे यांना ९/३/२००६ रोजी मिळाली, त्यांच्या अपिलाची सुनावणी दिनांक ७/४/२००६ रोजी झाली व अपिलीय प्राधिकारी तथा सहपोलिस आयुक्त, पुणे शहर यांनी दिनांक १३/४/२००६ रोजी अपील निकाली काढले. द्वितीय अपिलाच्या सुनावणीपर्यंत वर्षभराचा कालावधी निघून गेला आहे, आपला मूळ प्रश्न

अद्यापही कायम आहे, असे श्री. गंडाळे यांनी दिनांक १७/४/२००७ रोजी घेतलेल्या सुनावणीत सांगितले. दरम्यानच्या काळात या विषयाबाबत पोलिसांनी आणखी काही कारवाई केली आहे, असे श्री. प्रभात रंजन यांनी सांगितले व त्याबाबतची माहिती देण्याची तयारी दर्शविली.

उभय बाजूंचे म्हणणे ऐकून घेता अपीलकर्त्याचा मूळ प्रश्न त्याने अन्यायाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित पोलिस, बांधकामदार व घरमालक यांच्यावर कारवाई करण्याविषयीचा आहे. त्या विषयाची माहिती देण्याबाबत पोलिस विभागाची भूमिका नकारात्मक नाही. या दोन्ही बाबी लक्षात घेता या विषयाबाबत आजतागायत पोलिसांनी केलेल्या कारवाईची माहिती श्री. गंडाळे यांना त्वरेने मिळणे आवश्यक आहे. म्हणून मी पुढील आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. गंडाळे यांनी मांडलेल्या विषयाबाबत, तसेच देशभ्रतार अहवालाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईबाबतची व विशेषतः गेल्या वर्षभरात केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती श्री. नरहरी पांडुरंग गंडाळे यांना दिनांक ६/५/२००७ पर्यंत पोलिसांनी द्यावी, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारु नयें.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला,
कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

**अपील क्रमांक : १७/पुणे/२००७**
सुनावणी दिनांक :- १८/४/२००७

श्री. साळुंके तुषार शिवदास
श्रीदत्त पॅलेस सनसीटी रोड, — अपीलकर्ता
आनंदनगर सिंहगड रोड,
पुणे ४११ ०५१.

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे विभाग, पुणे.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे विभाग, पुणे

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. तुषार शिवदास साळुंके (सिंहगड रोड, पुणे), यांनी, `पुणे पाटबंधारे विभागाने वडीवळे उजवा कालवा भराव व खोदकामाच्या संदर्भात तीन संस्थांना अदा केलेली

अंतिम देयके व त्यांना परत केलेल्या अनामत रकमा` याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांच्याकडे दि. २२.११.२००५ रोजी केलेल्या अर्जाव्दारे मागितली होती. ही माहिती त्यांना दिली गेली नाही. तसेच प्रथम अपिलाचीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे त्यांनी दि. ३.५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे केलेले दुसरे अपील आयोगाकडे दि. ११.५.२००६ रोजी दाखल झाले. त्याची सुनावणी दि. १८.४.२००७ रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता श्री. तुषार शिवदास साळुंके, त्यांचे वडील श्री. शिवदास साळुंके, सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे श्री. मु.ज.यादव, अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे श्री. अ. वि. सुर्वे हे उपस्थित होते. धरण सुरक्षा पुनर्विलोकन समितीची ठाणे येथे अत्यंत महत्वाची पूर्वनियोजित बैठक असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. स.तु. पावसे आयोगाच्या पूर्वपरवानगीने अनुपस्थित होते. श्री. तुषार साळुंके यांना या ठेकेदारीच्या व्यवहारातील काही कल्पना नसल्यामुळे त्यांच्या वतीने आपणच पूर्ण बाजू मांडणार असल्याचे त्यांचे वडील श्री. शिवदास साळुंके यांनी सांगितले. ठेकेदारीच्या कामाबाबतचा हा विषय १९९२ ते १९९९ या कालावधीशी संबंधित आहे. या काळात श्री. शिवदास साळुंके पाटबंधारे खात्यात प्रथम लिपिक होते. सन २००१ साली ते सेवानिवृत्त झाले. श्री. साळुंके यांची `प्रितम एंटरप्राईजेस` ही संस्था वगळता इतर दोन संस्थांच्या अनामत रकमा परत करण्यात आल्या. मात्र वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे `प्रितम एंटरप्राईजेस`ची ही रक्कम जप्त करण्यात आली, हा यातील मुख्य विषय. माहितीच्या अधिकाराचा वापर हा जप्त केलेली रक्कम परत मिळविण्यासाठी श्री. शिवदास साळुंके करीत असलेल्या विविध प्रयत्नांचा एक भाग आहे.

श्री. साळुंके यांना दिलेले काम मार्च १९९३ मध्ये पूर्ण झाले. अंतिम देयके ऑक्टोबर १९९८ मध्ये अदा झाली. देयकापोटी जमा केलेल्या अनामत रकमा परत मिळाव्यात यासाठी मे २००० पासून अर्ज आदी मार्गांनी त्यांनी प्रयत्न सुरु केले. इतर दोन ठेकेदारांच्या रकमांचा परतावा देताना कोणते निकष वापरले याचा तपशील ते सातत्याने मागत राहिले. माहितीचा अधिकार अधिनियमाखाली त्यांनी मागितलेल्या माहितीत हाच मुख्य भाग आहे.

श्री. साळुंके यांचा दि. २१.११.२००५ चा अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांना दि. २२.११.२००५ रोजी मिळाला. त्यांच्या वतीने श्री. अ.ए. भेलके यांनी दि. २९.११.२००५ रोजी श्री. साळुंके यांना कळविले, "आपण सदरचा अर्ज, माहितीचा अधिकार २००५ मधील कलम ६ नुसार विहीत नमुन्यात सादर करावा. तसेच सदरची माहिती आपण कशासाठी हवी आहे याचाही उल्लेख करावा." त्यावर श्री. साळुंके यांनी दि. ३.१२.२००५ रोजी उत्तर पाठविले, "माहितीचा अधिकार २००५ मधील कलम ६ नुसार विहीत नमुन्यात अर्ज सादर करणेचे बंधन नाही, तरी सुध्दा महाराष्ट्र शासनाने दि. ११.१०.२००५ च्या असाधारण राजपत्रात या कायद्याच्या कलम २७ (२) अन्वये जे नियम प्रसिध्द केले आहेत त्यामध्ये जो अर्जाचा विहीत नमुना दिलेला आहे त्यानुसारच हा अर्ज केलेला आहे. माहितीचा अधिकार २००५ मधील कलम ६ (२) नुसार माहिती कशासाठी पाहिजे ते नमूद करणेचे बंधन अर्जदारावर नाही."

श्री. साळुंके यांना हवी असलेली माहिती ती विशिष्ट तक्त्यांच्या स्वरुपात मागितली होती. माहिती संकलित करुन देण्यास विलंब लागेल, असे कार्यकारी अभियंता श्री. स.तु.पावसे यांनी दि. २२.१२.२००५ च्या पत्रान्वये श्री. साळुंके यांना कळविले. त्याच बरोबर `आपणांस संयुक्तिक वाटल्यास चर्चा करणेसाठी या कार्यालयात यावे`, अशी विनंतीही केली. चर्चेसाठी येणे आपल्याला संयुक्तिक वाटत नसल्याचे श्री. साळुंके यांनी कळविले. विहीत मुदतीत माहिती

न मिळाल्यामुळे श्री. साळुंके यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचेकडे दि. ३०.१.२००६ रोजी अपील दाखल केले.

श्री. साळुंके यांनी `प्रितम एंटरप्राईजेस,` `नोव्हेल कंस्ट्रक्शन,` `व व्ही.एस. हंडा` या तीन ठेकेदारांच्या बाबतची माहिती मागितली होती. त्यातील `प्रितम एंटरप्राईजेस` ही श्री. साळुंके यांची स्वत:ची संस्था आहे. त्यामुळे इतर दोन ठेकेदारांच्या संस्था हा माहितीचा अधिकार अधिनियम कलम ११ अन्वये त्रयस्थ पक्ष मानून श्री. पावसे यांनी दि. १.२.२००६ रोजी श्री. साळुंके यांना कळविले, "सदरची माहिती आपणास पुरविण्यासाठी संबंधित कंत्राटदारांचे निवेदन मागविण्यात आले असून माहिती प्रकट करण्याबाबत संबंधितांचे निवेदन प्राप्त

झाल्यानंतर त्यानुसार आपणास माहिती पुरविली जाईल." परंतु या त्रयस्थ पक्षांनी संबंधित माहिती गोपनीय मानलेली नाही, असे श्री. साळुंके यांनी दि. २८.२.२००६ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केले.

वस्तुत: पाटबंधारे खात्याने सार्वजनिक कामासाठी दिलेल्या रक्कमा ही गोपनीय बाब नाही. तेथे त्रयस्थ पक्षाची बाजू जाणून घेण्याचा संबंध येत नाही. ही माहिती कोणालाही केव्हाही उपलब्ध असली पाहिजे अशी आहे. मात्र अन्य दोन पक्षांनी माहिती गोपनीय मानलेली नाही, असा हवाला अर्जदाराच कसा देऊ शकतो, अशी विचारणा करता `यातील एका संस्थेत श्री. तुषार साळुंके भागिदार होते,` असे श्री. शिवदास साळुंके यांनी सुनावणीत सांगितले.

माहिती उपलब्ध झाल्यानंतर संकलित करुन देण्यात येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. साळुंके यांना कळविले होते. कार्यालयाच्या जागा बदलल्यामुळे संबंधित अभिलेख उपलब्ध होत नव्हते. त्यातील बरेच आता सापडले आहेत व उर्वरीत अभिलेखही पंधरा दिवसांत मिळू शकतील, असे श्री. सुर्वे यांनी सुनावणीत सांगितले. श्री. शिवदास साळुंके

पाटबंधारे विभागातच सेवेला होते. त्यामुळे अभिलेखाबाबतची ही वस्तुस्थिती त्यांनाही माहीत आहे, असे श्री. सुर्वे व तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. मु.ज.यादव यांनी नमूद केले. श्री. साळुंके यांनी ते मान्य केले.

तीनही ठेकेदारांची प्रकरणे समान होती. परंतु इतरांची अनामत रक्कमही जप्त केलेली असताना तत्कालीन अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा करुन, त्यांच्याकडून अर्ज घेऊन ती परत दिली. आणि आपल्याशी चर्चा करुन अर्ज घेऊनही `प्रितम एंटरप्राईजेसची` अनामत रक्कम परत दिली नाही, असे प्रतिपादन श्री. शिवदास साळुंके यांनी केले.

वरील माहिती लक्षात घेता मूळ विषय माहिती मिळविण्याचा नसून रक्कम परत मिळविण्याचा आहे, आणि तो माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेतील नाही. त्यामुळे आता उपलब्ध असलेली माहिती त्वरित व उर्वरीत माहिती पंधरा दिवसांत मिळू शकेल, हे श्री. साळुंके यांच्या निदर्शनाला आणण्यात आले. परंतु जप्त रक्कम आता परत मिळणार नाही, असे श्री. सुर्वे यांनी स्पष्ट केले. रक्कम परत मिळणार नसेल तर आपण सदर अपील मागे घेऊ इच्छितो, असे श्री. साळुंके यांनी सांगितले. उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांच्या या प्रस्तावाशी सहमती दर्शविली.

पाटबंधारे विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रारंभापासून दिलेल्या उत्तरामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमाची पूर्ण कल्पना नसणे, त्यातील तरतुदींचा चुकीचा/सोयीस्कर अर्थ लावणे व काळकाढूपणा करणे हेच प्रामुख्याने दिसून येते. श्री. साळुंके हेही माहिती मिळविण्यापेक्षा अनामत रक्कम परत मिळविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर करु पहात असल्याचे स्पष्ट होते.

माहितीचा अधिकार हा इतक्या सहजतेने घेण्याचा विषय नाही. त्याचे गांभीर्य राखले गेले पाहिजे, तसेच त्याचा वापरही विवेकाने आणि जबाबदारीने केला गेला पाहिजे. उभय पक्षांनी अथवा त्यापैकी कोणीही आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्याचा वापर करण्याचा

प्रयत्न करणे आणि ते साध्य होत नाही असे आढळल्यास सर्व प्रक्रिया बाजूला सारणे जबाबदारपणाचे नाही. असे वर्तनही दंडास पात्र मानावे लागेल, याची जाणीव सर्व संबंधितांना देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. साळुंके यांना हवी असलेली माहिती दि. १५/५/२००७ पर्यंत द्यावी.

पुणे
दिनांक :- ३०/०४/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला,
कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

अपील क्रमांक : ४०/पुणे/२००७
सुनावणी दिनांक :- १८/४/२००७

श्री. मोईन वझीरुद्दिन कुरेशी
येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, अपीलकर्ता
पुणे ४११ ००६

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलिस आयुक्त,
(पुणे शहर)

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, मुख्यालय,
(पुणे शहर)

## विवेचन

अपीलकर्ता मोईन वझीरुद्दिन कुरेशी, येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे - ६ यांनी दि. ५.५.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे शहर

यांचेकडे अर्ज केला होता. आपल्या अटकेच्या व संबंधित गुन्हा नोंदीच्या संदर्भात इन्स्पेक्टर श्री. विष्णु माने यांनी अतिरिक्त पोलिस आयुक्तांना दि. ४.२.२००५ रोजी पाठविलेल्या पत्राची साक्षांकित प्रत अर्जदाराने मागितली होती. हे पत्र लष्कर पोलिस ठाण्यात दि. १०.५.२००६ रोजी स्वीकारले गेले. दि. १०. ६.२००६ पर्यंत आपल्याला त्याबाबत काहीही कळविले गेले नाही, असे पत्र दि. ९. ६.२००६ रोजी अर्जदाराने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.एस.सोळुंके, पोलिस उपआयुक्त यांना पाठविले. दरम्यान श्री. एस.एस. सोळुंके यांनी त्याला दि. ७.६.२००६ रोजी उत्तर पाठविले. संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडून मागविलेल्या माहितीच्या पत्रांच्या प्रती श्री. सोळुंके यांनी अर्जदाराला पाठविल्या. श्री. कुरेशी यांचे विरुध्द मोका न्यायालयात खटला दाखल असून त्या विषयीचा तपशील न्यायालयात सादर केला जाईल, असा त्याचा सारांश आहे. दि. ५.५.२००६ रोजी अर्जदाराने जन माहिती अधिकाऱ्यांना खुलासा विचारण्याच्या स्वरुपाचे पत्र माहितीचा अधिकार अधिनियमाखाली पाठविले. पुण्यातील लष्कर पोलिस ठाण्याचे अधिकाऱ्यांनी कुरेशी यांना मोकाखाली अटक केली होती. या अधिकाऱ्यांनी आपल्या विरुध्द खोटे आरोप ठेवून आपल्याला गुन्ह्यात गोवलेले आहे, असे या पत्रात म्हटले आहे. त्या संदर्भात दि. १६.३.२००५ व दि. २९.३.२००५ रोजी पुण्याच्या पोलिस आयुक्तांकडे कुरेशी यांनी अर्ज केले होते व तक्रारही दाखल केली होती. याबाबत कारवाई का केली गेली नाही, याचा लेखी खुलासा अर्जदाराने मागितला होता. आपल्याला हे उत्तर मिळाले नाही, म्हणून अर्जदाराने प्रथम अपील न करताच राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.६.२००६ रोजी अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दि. १८.४.२००७ रोजी घेण्यात आली. तत्कालीन जन माहिती अधिकारी (सध्या सोलापूरचे जिल्हा पोलिस अधिक्षक) श्री. एस.एस. सोळुंके उपस्थित होते. अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलिस आयुक्त, (पुणे शहर) श्री. प्रभात रंजन पूर्व प्रवानगीने अनुपस्थित होते. अपीलकर्ता येरवडा कारागृहात असून अपिलाच्या सुनावणीसाठी आपल्याला गार्ड सोबत उपस्थित करण्याचा आदेश येरवडा

कारागृहाच्या अधिक्षकांना द्यावा, असे विनंतीपत्र त्यांनी पाठविले होते. परंतु अशा प्रकारे उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, अर्जदार त्याचे म्हणणे लेखी निवेदनाव्दारे पाठवू शकतो, असे त्यांना कळविण्यात आले आहे. दि. २७/४/२००७ पर्यंत त्यांनी लेखी निवेदन पाठविलेले नाही. अपीलकर्ता मोका खटल्यातील आरोपी असून अन्य काही गुन्हेही त्याच्या विरुध्द नोंद आहेत, अशी माहिती पोलिसांच्या वतीने या वेळी देण्यात आली. संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असून गुन्ह्यात खोटेपणाने गुंतविल्याच्या अर्जदाराच्या म्हणण्याबाबत मोका न्यायालयात निर्णय होईल. असे श्री. सोळुंके यांनी निदर्शनास आणले. तो न्यायालयीन कक्षेतील विषय आहे. अर्जदाराबाबतची पोलिसांकडील गुन्ह्यांची नोंद व न्यायालयीन प्रक्रिया यांचा विचार करता अर्जदाराला शक्य तेवढी माहिती पोलिसांनी दिली आहे. संबंधित विषयात व आपण पाठविलेल्या पत्रांवर कारवाई का केली गेली नाही, असे स्पष्टीकरण माहितीचा अधिकार अधिनियमात मागता येणार नाही.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील नामंजूर.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २७/०४/२००७